DISCOVERY
(International Multidisciplinary Refereed Research Journal)
(Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal)
ISSN: DOI: IMPACT FACTOR:

# शिक्षणाचे पैलू

**प्रा. डॉक्टर योगिता बारी**

सहाय्यक प्राध्यापक

बापूसाहेब डी डी विसपुते शिक्षण शास्त्र महाविद्यालय, धुळे

DOI No: DOI Link:

**सांस्कृतिक आणि व्यावसायिक शिक्षण**

शिक्षणाची ही सर्वात जुनी पद्धत होय. प्राचीन काळापासून ही पद्धती प्रचलित असल्याचे दिसून येते भारतात तसेच युरोपातील अनेक देशात सांस्कृतिक पद्धतीचे शिक्षण दिले जात होते लिबरल यातील मूळ शब्द लिबर असा असून त्याचा अर्थ मुक्त किंवा स्वतंत्र असा होतो. स्वतंत्र करणारे किंवा मुक्त करणारे शिक्षण हे सांस्कृतिक शिक्षण होय सांस्कृतिक शिक्षणाला उदारमतवादी शिक्षण असेही म्हटले जाते.

प्राचीन ग्रीस देशात सांस्कृतिक शिक्षणाची सुरुवात झाली, सॉक्रेटिस हा त्याचा प्रणेता होय त्या काळात ग्रीस मध्ये राज्यकर्ता वर्ग आणि गुलाम वर्ग असे दोन वर्ग अस्तित्वात होते शारीरिक काबाडकष्ट करणाऱ्या लोकांचा समावेश गुलाम वर्गात केला जाईल राज्यकर्ता लोकांना शारीरिक कष्ट करावे लागत नसत त्यांना उपजीविकेची चिंता नव्हती राज्यकर्ता लोकांच्याकडे गुलाम वर्ग कष्ट करीत असे कष्ट उपसणाऱ्या लोकांना म्हणजे गुलामांना शिक्षण घेण्यासाठी फुरसत मिळत नसे. याउलट राज्यकर्ता वर्गातील लोकांना शिक्षणासाठी भरपूर वेळ मिळत असे त्या काळात ज्ञानाच्या कक्षा आजच्या इतक्या रुंदावलेल्या नव्हत्या त्यामुळे विषयांचे आणि अभ्यासक्रमाचे स्वरूप अनिश्चित असे शिक्षण देणे म्हणजे सद्‌गुण रुजविणे इतकीच शिक्षणाची मूलभूत कल्पना होती.

**सांस्कृतिक शिक्षणाची वैशिष्ट्ये व महत्त्व**

1. संस्कृती शिक्षणाचा संबंध केवळ मनाशी येतो हे केवळ मानसिक विकास साधणारे शिक्षण आहे. या शिक्षणाचा व्यावसायिक किंवा तांत्रिक शिक्षणाशी काहीही संबंध नाही असे मानले जाई. सांस्कृतिक शिक्षणाचे हे खास वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल.

2. या पद्धतीतील शिक्षणात पुस्तके विद्येवर विशेष भर दिला आहे. ज्ञानासाठी ज्ञान संपादित केले जाते. शब्दज्ञान या प्रकारच्या शिक्षणाचा आधार आहे.

3. संस्कृती शिक्षण हे उच्च वर्गातील लोकांसाठी मर्यादित होते. कामगार वर्गातील तसेच खालच्या वर्गातील लोकांना सांस्कृतीक शिक्षण दिले जात नसे.

4. या प्रकारच्या शिक्षणातून सुसंस्कृत, प्रतिष्ठित माणूस निर्माण व्हावा अशी अपेक्षा होती.

5. शिक्षण हे पोटापाण्यासाठी नसते हे या शिक्षणाने सिद्ध केले.

6. सांस्कृतिक शिक्षणात ज्ञानात्मक, भावात्मक तसेच व्यक्तीच्या अध्यात्मिक विकासावर भर दिलेला दिसून येतो .कलेविषयी तसेच साहित्या विषयाचा ही अभ्यास संस्कृतिक शिक्षणात समाविष्ट आहे.

7. संस्कृतीक शिक्षणाने तत्त्वासाठी जगण्याचा संदेश दिला शारीरिक सुखा विषयी तसेच व्यक्तीतील दुर्गुणाविषयी तितकारा निर्माण केला.

**व्यावसायिक शिक्षण**

विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी विद्या आणि सांस्कृतिक जीवनावर भर देऊन चालणार नाही तर शारीरिक शिक्षणावर तसेच ज्यामुळे अधिक उत्पादन होईल अशा कार्यक्रमांवर जास्त भर दिला गेला पाहिजे असे विचार त्या काळात साम्यवादाचा पुरस्कर्ता काल मार्क्सने व्यक्त केले कामापेक्षा त्या कामासंबंधीची निष्ठा अधिक मोलाची आहे माणसाची प्रतिष्ठा तो कोणते काम करतो यावर अवलंबून नसून तो ते काम किती निष्ठापूर्वक करतो यावर अवलंबून असते अशा प्रकारे पुस्तके विद्या पेक्षा व्यावसायिक निष्ठा कनिष्ठ प्रतीची मानली जाण्याचे दिवस संपुष्टात आले. व यातूनच व्यावसायिक शिक्षणाचा उदय झाला.

**व्यावसायिक शिक्षणाची उद्दिष्टे**

१ व्यवसायाविषयी आवड निर्माण करणे आणि उदरनिर्वाहासाठी व्यक्तीला व्यवसाय उपलब्ध करून देणे.

२ श्रमप्रतिष्ठा वृद्धिंगत करणे.

३ कल्पकता, प्रयोग क्षमता, उपयोजन क्षमता ,मानसिक शक्ती विकसित करणे.

४ व्यावसायिक शिक्षणातून व्यक्तीची व्यावसायिक कार्यक्षमता विकसित करणे.

५ उत्पादन क्षमतेचा विचार करून त्याद्वारे राष्ट्रीय संपत्ती वाढविणे आणि जीवनमान उंचावणे.

६ राष्ट्राची स्वयंपूर्णता विकसित करणे.

७ देशातील लोकांचे जीवन गरजा आणि आकांक्षा यांचा शिक्षणाशी योग्य संबंध प्रस्थापित करून राष्ट्रीय विकास घडवून आणणे.

८ विज्ञान व तंत्रा विषयी अद्यावत ज्ञान मिळविणे व देशाची सर्वांगीण प्रगती साधने.

९ देशात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनांचा जास्तीत जास्त उपयोग करणे.

१० औद्योगिक व तांत्रिक क्षेत्रात निर्माण झालेल्या सिविल, इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल, ऑटोमोबाईल ,कॉम्प्युटर यासारख्या उपशाखांसाठी जाणणारे लोक पुरविणे.

११ कोणत्याही राष्ट्राचा औद्योगिक विकास अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. कारण त्यावर आर्थिक विकास अवलंबून आहे हा आर्थिक विकास साधण्यासाठी व्यावसायिक शिक्षण घेणे.

१२ सामाजिक वाढत्या गरजा लक्षात घेऊन उत्पादन क्षमता वाढविणे व टिकविणे. अत्याधुनिक साधने निर्माण करण्यासाठी ती पूर्णपणे देशात बनविण्यासाठी व्यावसायिक शिक्षण आवश्यक आहे.

१३ सध्याच्या विज्ञान युगात होणाऱ्या तांत्रिक क्षेत्रातील प्रगतिशील मिळते जुळते घेता यावे यासाठी व्यावसायिक शिक्षण घेणे.

**समायोजनासाठी शिक्षण**

जीवन जगत असताना प्रत्येकाच्या मनात इच्छा आकांक्षा असतात परंतु या सर्वच इच्छा पूर्ण होतात असे नाहीत एखाद्या व्यक्तीला आयुष्यभर पायलट व्हायचे असते कोणाला मोठा बंगला बांधायचा असतो कारमधून फिरायचे असते कोणाला एखाद्या क्षेत्रात जागतिक कीर्ती संपादन करायची असते कोणाला देशाचे नेतृत्व करायचे असते तर कोणाला रणांगणावर पराक्रम गाजवायचा असतो व्यक्तीच्या मनात असलेल्या या इच्छांची आकांक्षांची पूर्तता झाली नाही तर व्यक्ती निराश होण्याची शक्यता असते आपले इप्सित पूर्ण झाले नाही म्हणून ती व्यक्ती जीवनात खचून जाण्याची नाव उमेद होण्याची शक्यता असते जीवनात येणाऱ्या परिस्थितीशी जुळवून घेणाऱ्या काही व्यक्ती असतात त्यांना पुष्कळ वेळा दुधाची ताण ताकावर भगवावी लागते. अशा व्यक्ती परिस्थितीशी जुळवून घेतात तडजोड करतात या तडजड करण्याच्या किंवा परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या क्षमतेलाच आपण समायोजन असे म्हणतो.

**समायोजनाच्या शिक्षणाची आवश्यकता**

समाजात जितक्या व्यक्ती तितक्या प्रकृती असतात व्यक्ती व्यक्तींच्या स्वभावात भिन्नता असते. काही व्यक्ती भांडखोर असतात. तर काही समंजस असतात काही व्यक्ती भित्रे असतात तर काही भेट असतात. काही व्यक्ती अहमगंडाने पछाडलेल्या असतात. तर काही न्यूनगंडाने पीडित असतात काही व्यक्ती वर्चस्व गाजविणाऱ्या असतात तर काही दुसऱ्या व्यक्तीस सांगतील ते ऐकून जीवनाची वाटचाल करणाऱ्या असतात व्यक्तीच्या स्वभावाला असे भिन्न भिन्न प्रकारचे कंगोरे असतात. या सर्व व्यक्तींना जीवनात समायोजन साधण्याची नितांत आवश्यकता असते. समायोजनाचे शिक्षण त्यांनी घेतले तर त्यांच्या जीवनाला ते पोषक ठरते.

प्रत्येक व्यक्तीला या नात्या कारणासाठी समायोजन साधण्याची आवश्यकता असते समायोजन साधण्याची कला त्याला शिक्षणाच्या माध्यमातून प्राप्त करून घेता येते. जीवनात यशस्वी होण्यासाठी समायोजनाची गरज आहे जीवनाशी पदोपदी त्याला मिळते जुळते घ्यावे लागते. जीवनाची व्याख्या करताना एका विचारवंताने जीवन हे एक समायोजनच आहे असे म्हटले आहे लाईफ इट्स सेल्फ इज अड्जस्टमेंट या ओक्ती वरून व्यक्तीच्या जीवनात समायोजनाने किती जागा व्यापलेली आहे हे लक्षात येते

व्यक्तीला निसर्गाशी मिळते जुळते घ्यावे लागते. प्रदेशातील उपलब्धतेनुसार आहारात समायोजन साधावे लागते .हवामानानुसार कपड्यात योग्य ते बदल करावे लागतात. हे सारे समायोजनच आहे .

**संदर्भ ग्रंथ**

1. करंदीकर सुरेश, 1995 भारतीय समाजातील शिक्षण फडके प्रकाशन कोल्हापूर

2. कुलकर्णी विश्वंभर, 1994 उदयनुक भारतीय समाज संस्कृती आणि शिक्षण श्री विद्या प्रकाशन पुणे

3. कोंडेकर ए वाय 1992 भारतीय सामाजिक समस्या फडके प्रकाशन कोल्हापूर

4. करंदीकर सुरेश ,मंगुळकर मीना, 2006 उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण फडके प्रकाशन पुणे